# मेट्रो-३ च्या २१ किलोमीटर बोगद्याचे काम पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ भुयारी मार्गाचे काम वेगाने सुरु असून, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार, २१ किलोमीटर बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे.

महत्त्वाचे म्हणजे बोगद्याप्रमाणेच पायलिंग, सिगमेंट रिंग कास्टिंग, ब्रेक थ्रू, बेस स्लॅब अशी कामेही वेगाने सुरु असल्याचे कॉर्पोरेशनकडून सांगण्यात आले. नुकतेच आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि सहार रोड येथील बोगद्याचे काम यशस्वी पूर्ण करण्यात आले.

मुंबई मेट्रो-३ प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर सुमारे १६ लाख रेल्वे प्रवाशांना वातानुकूलित डब्यातून प्रवास करणे शक्य होईल. प्रवासाच्या वेळेत घट, ध्वनी व हवेच्या प्रदूषणात घट, सुरक्षित व आरामदायी प्रवास अशा अनेक सोयीसुविधा उपलब्ध होतील. मेट्रोचा हा मार्ग महत्त्वपूर्ण व्यावसायिक केंद्रांशी, शैक्षणिक संस्था, मनोरंजनाची ठिकाणे तसेच स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडला जाईल.



## अत्याधुनिक तंत्राचा वापर

- भुयारीकरण करताना बोगदे खोदाई यंत्राचा वापर करण्यात येतो.
- या कामासाठी म्हणजे ड्रिलिंगसाठी पर्याय म्हणून अत्याधुनिक पद्धत वापरण्यात येते.
- गोल आडवा छेद घेताना छेदन व विस्फोटन पद्धतीला पर्याय म्हणून वापरले जाते.
- छेद व आच्छादन अंतर्गत जमिनीस छेद देऊन पुन्हा आच्छादित केले जाते.
- नवीन ऑस्ट्रीयन बोगदे खोदाई पद्धत या अंतर्गत आधुनिक बोगदा बांधकाम पद्धतीमध्ये खडक किंवा माती गोलाकार पद्धतीने खणून बोगदा तयार केला जातो.